**प्रतिवादीतर्फे सा. क्र.१**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव –रघुनाथ झामाजी भुडे.

**प्रतिवादीतर्फे सा.क्र.१ चा उलटतपास शपथेवर वादी तर्फे वकील श्री सी.जी.अखंडे यांच्या मार्फत शपथेवर सुरू.**

**११.** वादी उत्तम हा माझा लहाण भाऊ आहे. आम्ही एकून तीन भाऊ आणि दोन बहीणी असे आहोत. माझे शिक्षण बी.एस.सी. झालेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, जुने गट न.५३,८४,१०० ह्या जमीनी मला माझ्या आजोबाकडून मृत्युपत्रान्वये मिळालेल्या आहेत. हे म्हणणे खरे नाही की, सदर गट नंबर मधील जमिनी ह्या माझ्या आजोबाच्या वडीलोपार्जित मिळकती होत्या. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आजोबांनी सदर जमीनी ह्या खरेदी केलेल्या होत्या. सदर जमीनी माझ्या आजोबांनी खरेदी केल्या होत्या हे दाखविण्यासाठी मी अभिलेखावर पुरावा दाखल केलेला नाही. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, माझ्या आजोबांनी सदर जमीनी खरेदी केल्याबाबत मी सदर खरेदीखत अभिलेखावर दाखल करू शकतो.

**१२.** माझ्या वाटणीला गट न.४७ मधील तीन हेक्टर भाग माझ्या वाट्याला आला होता. तसेच गट न.४७ मधील १.१७ हेक्टर आर शेती माझा भाऊ पुरूषोत्तम याच्या वाट्याला आली होती. सदरची वाटणी ही आम्हा दोन भावांमध्ये सन २०१७ मध्ये झाली होती व त्याबाबत वाटणीपत्र झाले होते. हे म्हणणे खरे नाही की, सदर वाटणीच्या वेळी आम्ही आमच्या वाट्याला आलेल्या शेती महसुल विभागाकडून मोजणी करून घेतल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे आहे की, मी सदर मोजणीची 'क प्रत' अभिलेखावर दाखल केली आहे. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, मी सदर जमीनीचा विभक्त झाल्याचा ७/१२ अभिलेखावर दाखल केला आहे.

**प्रश्न–**गट न.४७, ४८ मध्ये विहीर दाखविलेली आहे ती तुम्हीच खोदली आहे काय?

**उत्तर–**मीच खोदली आहे व ती विहीर गट न.४७ मध्ये आहे, गट न.४८ मध्ये नाही.

**१३.** सदर विहीर मी सन १९९३–९४ मध्ये खोदलेली आहे.

**प्रश्न–**सन १९९३–९४ मध्ये तुमच्यामध्ये वाटणी झाली नव्हती बरोबर आहे काय?

**उत्तर–**७/१२ वेगळा होता.

हे म्हणणे खरे आहे की, वादीच्या शेताचा नंबर गट न.४८ आहे व तो माझ्या शेताला लागुन आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी सदर विहीर खोदली होती. हे म्हणणे खरे नाही की, ज्यावेळेस विहीर खोदली होती त्यावेळेस सदर विहीर ही गट न.४७ व ४८ च्या धु–यावर होती. हे म्हणणे खरे नाही की,वादी यांनी सन १९९९ मध्ये सदर विहीरीवर विज कनेक्शन घेतले होते. हे म्हणणे खरे नाही की, दि.१३/१२/१९९९ रोजी वादी यांनी सदर विहीरीवर विज कनेक्शन नि.क्र.२४ प्रमाणे घेतले होते.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, गट न.४७ ची वाटणी ज्यावेळी झाली त्यावेळी सदर शेतीतील उत्तर–दक्षिण धुरा सरळ न दाखविता मी विहीर कब्ज्यात घेण्यासाठी भुमापन अधिकारी यांच्याकडून चुकीची मोजणी करून घेतली. हे म्हणणे खरे नाही की, सन १९९९ मध्ये ज्यावेळी वादी यांनी एम.एस.सी.बी. कडे ७/१२ सह अर्ज केला त्यावेळी गट न.४८ मध्ये विहीरीची नोंद होती.

**१५.** आता मला गट न.४८ च्या सन २०२१ ते २०२४ च्या ७/१२ ची सत्यप्रत दाखविण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की, सदर ७/१२ च्या उता–यामध्ये गट न.४८ मध्ये विहीर दाखविलेली आहे. आता मला गट न.४७ च्या सन २०१५ ते २०२५ च्या ७/१२ ची सत्यप्रत दाखविण्यात आली. आता मला सदर ७/१२ च्या उता–यातील मजकुर 'अन्य सर्व्हे नंबर वरिल विहीर' असा मजकूर नमद आहे, तो खोटा मजकूर आहे खरा नाही.

**१६.** आता मला नि.क्र.३७ वरिल वाटणीपत्र दाखविण्यात आले त्यामध्ये वादी यांनी साक्षीदार म्हणून सही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, नि.क्र.३७ मध्ये असे लिहीले आहे की, पुरूषोत्तम यांचा सदर विहीरीवर काही अधिकार राहणार नाही.

**प्रश्न–**नि.क्र.३७ मध्ये असे लिहीले आहे काय की, पुरूषोत्तम शिवाय इतर कोणाचा सदर विहीरीमध्ये अधिकार राहणार नाही?

**उत्तर–** तिस–याचा काही संबंधच नाही व उत्तम याचा सदर विहीरीशी काही संबंध नाही.

उत्तम याचा अधिकार सदर विहीरीवर आहे असे काही नि.क्र.३७ मध्ये नमुद नाही.

**प्रश्न**–तुम्ही सन २०२२ मध्ये उत्तम याला सदर विहीरीवरून पाणी घेण्यास मनाई केली होती व झगडा भांडण केले होते काय?

**उत्तर**–सदर विहीरवरून मीच पाणी घेत आहे, उत्तम याचा सदर विहीरीशी काही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, उत्तम याने सदर झगडा भांडणावरून माझ्याविरूध्द पोलिसांत फिर्याद दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी उत्तम याला पाणी भरण्यास मनाई केल्यामुळे मला उत्तम याने वकीलामार्फत नोटिस दिली होती. उत्तम याने माझ्या विरोधामध्ये सदर केस दाखल केली आहे.

**१७.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांनी त्यांच्या तिन्ही मुलांना विहीरीचे पाणी घेता यावे यासाठी त्यांनी त्यांच्या हयातीतच सदर विहीर खोदली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर विहीर बुजवायच्या तयारीत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर विहीर ही वडीलोपार्जित असल्यामुळे उत्तम याचा सदर विहीरीवर अर्धा अधिकार आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या वडीलांचा मोठा मुलगा असल्याने व कर्ता असल्याने मी माझ्या मनाप्रमाणे वाटणी करून घेतली. हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे न.४८ मध्ये विहीर असतांना मी महसुल अधिकारी यांच्याशी संगणमत करून सदर विहीर ही सर्व्हे न.४७ मध्ये खोट्या स्वरूपात दाखविलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे व खोटे शपथपत्र दाखल केले आहे.

**उलटतपास पुर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि १७.०२.२०२६

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड